# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३

## (सकाळी ०९.४५ ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना)**

(१) **ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, संजय केळकर, बंटी भांगडिया, मंगेश चव्हाण, योगेश सागर, अतुल भातखळकर, मिहीर कोटेचा, पराग शाह, गणपत गायकवाड, कुमार आयलानी, संतोष दानवे, श्रीमती श्वेता महाले, डॉ.भारती लव्हेकर, श्री.रईस शेख, ॲड. राहुल कुल, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. छगन भुजबळ, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, रोहित पवार, दत्तात्रय भरणे, शेखर निकम, संजय बनसोडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व औषध प्रशासन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"देशातून निर्यात झालेल्या सदोष कफसीरपमधील हानीकारक घटकद्रव्यांमुळे ६६ मुलांचा मृत्यू झाल्याची शक्यता जागतिक आरोग्य संघटनेने निदर्शनास आणून दिल्यानंतरही राज्यात तयार होणाऱ्या विविध प्रकारच्या औषधाच्या गुणवत्ता तपासण्या (स्टॅबिलिटी स्टेट) झाल्यानंतरच जागतिक बाजारपेठेत पाठवणे बंधनकारक असताना राज्यातील २०० औषध उत्पादकांकडून तयार करण्यात येणारी २००० पेक्षा अधिक औषधे कोणत्याही प्रकारच्या स्थिरता चाचणी प्रमाणपत्र न घेताच निर्यात होत असल्याचे फेब्रुवारी २०२३ मध्ये आढळून येणे, त्यामुळे राज्यातील या २०० औषध उत्पादकांची सखोल चौकशी करून त्यांचे परवाने रद्द करून कारवाई करण्याची आवश्यकता असणे, याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

अग्रिम प्रत

(२) **श्री.प्रकाश आबिटकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"राज्यात पत संस्थांची संख्या अंदाजे १३३७९ असून ग्राहक सभासद संख्या १ कोटी ३५ लाखांहून अधिक असून एकुण ठेवींची संख्या अंदाजे ५७३२२ कोटी रुपये असणे, यामध्ये प्रामुख्याने पतसंस्थेतील ठेवींना संरक्षण मिळाले पाहीजे याकरीता शासन स्तरावरुन उपाययोजना होणे गरजेचे असणे, दिवसेंदिवस खाजगी फायनांन्स करणाऱ्या विविध कंपन्यांमुळे वाढती स्पर्धा, वसुली करताना येणाऱ्या अडचणी या सर्व आर्थिक परिस्थितीमुळे पतसंस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, सध्याच्या परिस्थितीत पतसंस्थेस कारभार चालवण्यासाठी शासनाकडून कुठल्याही प्रकारची आर्थिक मदत करण्यात न येणे, त्यामुळे पतसंस्थांचा कारभार त्यांच्या स्वखर्चाच्या बजेट मधून चालू असणे, पतसंस्थांकरिता नव्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये ९७ घटना दुरुस्तीअंतर्गत सहकारी पतसंस्थांना कोणत्याही प्रकारे विचारात न घेता त्यांचे आर्थिक परिस्थितीचा कोणताही विचार न करता त्यांना अंशदान अनुदान भरण्याची जाचक अट लागू करणे, अंशदान अनुदानाचा उपयोग कशासाठी होणार आहे याबाबत स्पष्टता नसल्याने सर्व संस्थांनी त्यास विरोध दर्शवून ते न भरण्याचे ठराव केला असणे, तसेच पतसंस्थांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान अथवा सवलती लाभत नसणे, या जाचक अटींचा दूरगामी विपरीत परिणाम संस्थेच्या आर्थिक प्रगतीवर होणे, यामध्ये प्रामुख्याने अपसेट प्राईजचा कालावधी वाढविण्याबाबत कार्यवाही करणे, कलम १०१ अन्वये जप्ती दाखल्याच्या विरुध्द पुनर्निरीक्षण अर्ज दाखल करणे, पतसंस्थांची विविध मानकांचे नियमित देखरेख करणे, कलम १४४/५ अ नुसार पतसंस्थांना फक्त "अ" वर्ग सभासदांकडूनच ठेवी स्वीकरण्याबाबत बंधन घालण्यात आल्यामुळे संस्थांना व्यवसाय करण्यात अडचणी येत असून "ब" वर्ग सभासदांकडूनही ठेव स्वीकरण्याच्या अनुषंगाने सुधारणा करणे गरजेचे असणे, कलम १४४/६ अ नुसार संस्थेच्या गरजा व मागणीनुसार अन्य कोणताही व्यापार व सेवा पुरविण्यास मज्जाव करण्यात आलेला आहे अशा संस्थांना किमान इतर सेवा करण्यास परवानगी देणेसह विविध मागण्यांबाबत पतसंस्थांकडून वेळोवेळी मागण्या करण्यात येत असतात, परंतू याबाबत कोणतीही कार्यवाही न होणे, तसेच याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.सहकार मंत्री महोदय यांचेस्तरावर दिनांक १९ जानेवारी, २०२२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतीवृत्तानुसार कोणतीही कार्यवाही अदयाप न होणे, त्यामुळे पतसंस्थांच्या प्रतिनिधी यांच्यामध्ये शासन विरोधी असंतोष निर्माण होणे, याबाबत शासन पतसंस्था चळवळ टिकावी, वृध्दींगत व्हावी यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना."

(३) **श्री.ऋतुराज पाटील, डॉ.राहूल पाटील, श्री.लहू कानडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील निराधार, अपंग आदींच्या पुनर्वसनासाठी शासनाने संजय गांधी, श्रावणबाळ आदी विशेष सहाय्याच्या योजना अंमलात आणल्या असणे, परंतू त्यातील उत्पन्नाची मर्यादा आजच्या काळाशी सुसंगत नसणे, याशिवाय या योजनांचा लाभ मिळविण्यासाठी दरवर्षी उत्पन्नाचा दाखला देण्याची जाचक अट असणे, त्यामुळे अनेक गरीब व गरजू या योजनेपासून वंचित राहत असणे, त्यामुळे शासनाने निर्णय घेऊन या योजनांसाठी आर्थिक उत्पन्नाची मर्यादा ५० हजारांपर्यंत वाढविणे व दरवर्षी उत्पन्नाच्या दाखल्याची अट काढून टाकण्याबाबत आग्रही मागणी होत असणे, परंतू त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री. छगन भुजबळ, जयंत पाटील, डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री.अबू आजमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे क्रीडा व युवक कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय खेळाडू ऑलिम्पियन कविता राऊत, रोईंगपटू दत्तू भोकनळ आणि आंतरराष्ट्रीय धावपटू अंजना ठमके यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर राज्याचे नाव उज्वल केले असणे, राज्य शासनाने शासन निर्णय दिनांक ३० एप्रिल, २००५ नुसार आंतरराष्ट्रीय,राष्ट्रीय व राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला असणे, तर दिनांक १ मे, २०११ च्या शासन निर्णयानुसार आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली तर शासन सेवेत थेट नियुक्तीची मानके देखील निश्चित केलेली असणे, सदर शासन निर्णयातील वर्ग १ पदासाठी आवश्यक असलेले निकष या तिन्ही खेळाडूंनी पूर्ण केलेले असणे, या खेळाडूंची गट अ पदाकरिता शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्यासाठी क्रीडा आयुक्तांनी शासनास प्रस्ताव पाठवलेले असणे, शासनाने शासन निर्णय दिनांक २७ डिसेंबर २०१६, दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ आणि दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ अन्वये विविध अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना उप जिल्हाधिकारी, पोलीस उप अधिक्षक, तहसिलदार, जिल्हा क्रीडा अधिकारी यासह विविध गट "अ" पदांवर नियुक्ती दिलेली असणे, मात्र नाशिक जिल्ह्यातील या तिन्ही अत्युच्च गुणवत्ताधारक आणि पात्र खेळाडूंना गट "अ" पदावर शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्यासाठी अन्याय केला जात असणे, या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा आणि क्रीडा क्षेत्रातील

अग्रिम प्रत

त्यांच्या नैपुण्याचा विचार करून शासनाच्या क्रीडा धोरणानुसार त्यांची वर्ग १ पदावर शासकीय सेवेत थेट नेमणूक करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ सप्टेंबर, २०२२ वा त्या सुमारास आणि यापूर्वी अनेकदा शासनाकडे मागणी केलेली असणे, मात्र शासनाकडून दिरंगाई आणि टाळाटाळ केली जात असणे, त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील खेळाडूंमध्ये निर्माण झालेले निराशेचे व चिंतेचे वातावरण, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”

(५) **श्री.जयकुमार रावल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

“धुळे शहरात तोडीपाणी डॉट कॉम या संकेतस्थळावरील +1 (575)308-5981 या क्रमांकाच्या मोबाईल वरून शहरातील मुलींचे छुप्या पध्दतीने फोटो काढून त्यांच्या पालकांना व इतरांना पाठवून बदनामी करण्याचा भयंकर प्रकार धुळे शहरात माहे फेब्रुवारी, २०२३ वा त्या सुमारास उघडकिस येणे, याबाबत धुळे शहर पोलिस ठाण्यात गुन्हा देखील दाखल करण्यात येणे, यामुळे धुळे शहरात महिला व महाविदयालयीन मुलींमध्ये तसेच पालकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण, या गंभीर प्रकरणाची पोलिसांकडून अदयापपर्यंत कोणतीही दखल घेण्यात न येणे, उक्त प्रकरणी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांची चौकशी करून तोडीपाणी डॉट कॉम या संकतेस्थळाची चौकशी करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **मुख्यमंत्री** : (क) महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लिमिटेड यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

**(२) उच्च व तंत्र शिक्षण व वस्त्रोद्योग मंत्री** : (क) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे (अंकेक्षण अहवालासह) सभागृहासमोर ठेवतील.

(ख) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(ग) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि संविधानिक लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ङ) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित नागपूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल आणि वित्तीय पत्रके सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

**तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **डॉ. नितिन राऊत, सर्वश्री. बाळासाहेब थोरात, सुरेश वरपुडकर, अमित देशमुख, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री.विकास ठाकरे, श्रीमती सुलभा खोडके, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री. संजय जगताप, धिरज देशमुख, बळवंत वानखडे, अशोकराव चव्हाण, जितेश अंतापूरकर, मोहनराव हंबर्डे, माधवराव पवार, राजेश एकडे, अमीन पटेल, अस्लम शेख, सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, रोहित पवार, विनोद निकोले, अजित पवार, जयंत पाटील, छगन भुजबळ, संजय बनसोडे, दत्तात्रय भरणे, चेतन तुपे, दौलत दरोडा, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“राज्यात नवीन शैक्षणिक धोरणामध्ये संशोधनाला अधिक महत्त्व देण्यात येणे, त्यासाठी शैक्षणिक पात्रतेमध्येही बदल करण्यात येणे, त्यामुळे अनेक संस्था त्या-त्या समाजातील विद्यार्थ्यांचा संशोधनाचा टक्का वाढविण्यावर भर देत असून यासाठी अनेक योजनाही सुरू करण्यात आलेल्या असणे, मात्र आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या पदरी निराशाच आलेली असणे, राज्यातील अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांचे संशोधनामध्ये येण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याने हे प्रमाण वाढविण्यासाठी आणि या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना संधी मिळावी म्हणून 'आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थे'ने अधिछात्रवृत्ती योजना सुरू करावी अशी मागणी अनेक वर्षांपासून सुरू असूनही वित्त विभागाच्या अडथळयांमुळे अधिछात्रवृत्तीचा प्रश्न प्रलंबित असणे, परिणामी पीएचडी करून आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून बार्टी, सारथी व महाज्योती या तिन्ही संस्थांच्या धर्तीवर आदिवासी विद्यार्थ्यांसाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(२) **श्री.अनिल पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“पारोळा (जि.जळगाव) येथील उपविभागामध्ये जलसंधारणाच्या विविध कामांमध्ये कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये उघडकीस येणे, याबाबत लोकप्रतिनिधी व विविध संघटनांनी जिल्हाधिकारी, जळगाव तसेच तापी पाटबंधारे विकास महामंडळाकडे तक्रारी करणे, त्यानंतर जिल्हाधिकारी, जळगाव यांनी नेमलेल्या चौकशी समितीमध्ये सदरील तक्रारींमध्ये तथ्य आढळणे, मात्र चौकशी समितीने अनियमितता केल्याच्या नावाखाली सदरील अधिकाऱ्यांना संरक्षण देणे, सदरील कामांवर ठेकेदाराच्या मूळ देयकापेक्षा वाढीव व बनावट देयके अधिकाऱ्यांनी मंजूर करून घेणे, साठवण बंधारा फाफोरे बु व साठवण प्र ऊ पिंपरी या कामांवर मर्यादेपेक्षा अनुक्रमे १४.५८ लक्ष व ५.५९ लक्ष इतके अतिरिक्त देयके मंजूर करून घेण्यात येणे, परंतु चौकशी समितीद्वारे सदरील खर्च कार्यालयीन बाबींवर केला गेल्याचे नमूद करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई न करण्यात येणे, वास्तविक, कार्यालयीन बाबींसाठी जिल्हा नियोजन समितीकडून स्वतंत्र निधी देण्यात येत असतानाही अधिकाऱ्यांनी केलेली गैर कृत्ये झाकण्यासाठी चौकशी समितीने कार्यालयीन खर्चासाठी निधी वापरल्याचे सांगून शासनाची तसेच लोकप्रतिनिधींची फसवणूक व दिशाभूल करणे, जिल्हा जलसंधारण अधिकारी, जळगाव यांनी नेमलेल्या उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग, जळगाव यांच्या चौकशी समितीचा अहवाल अद्यापही प्रलंबित असणे, गैरव्यवहार झालेला उघडकीस येऊनही संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीही कार्यवाही न होणे, भ्रष्ट अधिकाऱ्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

अग्रिम प्रत

(३) **श्री.सुनिल कांबळे, डॉ.बालाजी किणीकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मातंग समाजाची वर्गवारी करुन अ, ब, क, ड नुसार स्वतंत्र आरक्षण देण्यासह समाजातील विविध मागण्यांसाठी लहुजी शक्ती सेनेच्या वतीने शासनास निवेदन देण्यात येणे, मातंग समाज हा महाराष्ट्रासह संपुर्ण देशात वास्तव्यास असणे, या समाजातील बहुतांशी नागरिक भूमीहीन असून, मोलमजुरी करून आपले जीवन जगत असणे, उच्च शिक्षणापासून हा समाज वंचित असणे, तसेच शासकीय सेवेत देखील या समाजातील युवकांची संख्या अत्यंत अल्प असणे, शासनाने त्यांच्या मागण्या व प्रश्न सोडवून त्यांना समाजाच्या प्रवाहात आणण्याची आवश्यकता, मातंग समाजास अ,ब,क,ड अनुसार वर्गवारी करून स्वतंत्र आरक्षण त्वरित लागू करण्याची आवश्यकता, साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्याची आवश्यकता, आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचे संगमवाडी (जि. पुणे) येथे भव्य स्मारक करण्यासाठी शासकीय पातळीवर लवकरात लवकर प्रयत्न करण्याची आवश्यकता, मुंबई विद्यापिठास साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यासाठी शासनाच्या मंजुरीची आवश्यकता,गंजपेठ पुणे येथील देशातील पहिली व्यायाम शाळा सुरू करून तेथे अनेक क्रांतिकारक घडविणाऱ्या लहुजी वस्ताद यांच्या क्रांती शाळेस लहुजी वस्ताद साळवे यांचे राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्याची आवश्यकता, लहुजी वस्ताद साळवे अभ्यास आयोग त्वरित कार्यान्वित करुन, त्यांचे नाव राष्ट्रपुरुषांच्या यादीत समाविष्ट करण्याची आवश्यकता, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे महामंडळातर्फे थेट कर्ज प्रकरण त्वरित सुरु करणे आणि अण्णाभाऊ साठे महामंडळाचे थकीत कर्ज माफ करण्याची मागणी लहुजी शक्ती सेनेच्या वतीने करण्यात येणे, मातंग समाजाच्या या सर्व मागण्यांवर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **डॉ.देवराव होळी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कल्याण डोंबिवली महानगरपालिका अंतर्गत विकास योजनेच्या आरक्षण क्रमांक २७ नुसार लालचौकी कल्याण येथील "आर्ट गॅलरी म्युझियम आणि व्यापारी संकुल" प्रकल्प शासनाच्या व मनपाच्या सर्व नियम व अटी पाळून १० वर्षापासून बांधून तयार असणे, परंतु सदर प्रकल्प अद्यापही पूर्णत्वास न गेल्यामुळे मनपाचे तसेच विकास कामांचे अतोनात नुकसान होणे, सदर प्रकल्पास लागणारे सर्व प्रकारचे सहाय्य करण्यास विकासक बांधील असणे, वरील विषय मान्य करून कल्याण डोंबिवली महानगरपालिका विशेष प्रकल्प /८४ दिनांक २६/८/२०२१ विभागाच्या प्रस्तावानुसार तसे आदेश निर्गमित करण्यासंदर्भात शासन स्तरावर प्रश्न प्रलंबित असणे, यासंदर्भात हिवाळी अधिवेशन २०२२

मध्ये तारांकित प्रश्न क्रमांक ५१७८५ च्या माध्यमातून शासनाला भूमिका स्पष्ट करण्यासंदर्भात विधानमंडळाकडे सादर असताना त्याच कालावधीत या विपरीत विषयाला धरून दिनांक २८/११/२०२२ रोजी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त यांच्या दालनात बैठकीचे आयोजन करण्यात आल्याचे उघडकीस येणे, हे प्रकल्प पूर्णत्वास न नेता केवळ आर्थिक लाभ मिळविण्याच्या हेतूने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त भाऊसाहेब दांडगे, शहर अभियंता अर्जुन अहिरे, लेखा वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, तरुण जुनेजा कार्यकारी अभियंता विशेष प्रकल्प तथा सदस्य सचिव यांनी जाणीव पूर्वक अडथळा निर्माण करणे, सदरहू प्रकरण अतिशय गंभीर असून मागील अनेक वर्षांपासून प्रकरण प्रलंबित ठेवणाऱ्या दोषींवर कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता, या कामात केवळ आर्थिक लाभ मिळविण्याच्या हेतूने अडथळा निर्माण करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”

(५) **श्री. भिमराव तापकीर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“पुणे जिल्ह्यातील खडकवासला धरणाच्या पाणलोटक्षेत्रात अतिक्रमणे वाढत असणे, अतिक्रमणांचे पुनर्सर्वेक्षण होण्याची आवश्यकता, पाटबंधारे विभागाकडे अतिक्रमणांची अद्ययावत माहिती उपलब्ध नसणे, जलसंपदा विभागाने धरणाच्या पाणलोटक्षेत्राबाहेरील पाटबंधारे विभागाच्या जमिनीची मोजणी करण्यासाठी भूमी अभिलेख विभागाकडे कोट्यावधी रुपयांचे चलने भरून तसा वारंवार पाठपुरावा करून देखील मोजणी प्रक्रिया सुरु झालेली नसणे, मोजणीस होत असलेल्या विलंबामुळे धरणक्षेत्रातील जमिनींवरील अतिक्रमणांना पाठबळ मिळत असणे, जमिनीच्या मोजणीस होत असलेल्या विलंबामुळे धरणाच्या पाणलोटक्षेत्रात जलसंपदा विभागाची नेमकी कोठे व किती जमीन आहे याची माहिती मिळत नसल्याने जलसंपदा विभागाच्या बहुतांश जमिनीवर, ओढ्या-नाल्यावर खाजगी व्यावसायिक स्वरुपाची अतिक्रमणे झाल्याचे निदर्शनास येत असणे, आजमितीस बहुतांश पूररेषा आणि पाणलोटक्षेत्रात अतिक्रमणे, बांधकामे झाली असणे, तसेच खडकवासला धरणाचे जलप्रदुषणात देखील वाढ झाली असून धरण व पाणलोटक्षेत्र व परिसरात कंपन्या, रेस्टॉरंट, रिसोर्ट व इतर व्यावसायिक स्वरूपाच्या बांधकामांमध्ये पूर्ण क्षमतेने सिवेज ट्रिटमेंट प्लांट व तद्नुषंगिक आवश्यक असणाऱ्या उपाययोजना न केल्याने राजरोसपणे सांडपाणी आणि कचरा व राडारोडा मिसळला जात असणे, धरणाचे जलप्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी सांडपाणी समस्या आणि घनकचरा व्यवस्थापन करिता कृती आराखडा करण्यात आला नसल्याने जलप्रदूषणाचा स्तर वाढत असल्याने आरोग्यास धोका निर्माण होणे, दुषित पाण्यामुळे त्यावर अवलंबून असलेले नागरिक व वनस्पती आणि प्राणी-पक्षी यांच्या जीवितास धोका निर्माण होणे, धरणाच्या व धरणाकडे येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न अतिशय गंभीर झाला असणे, धरणाची हद्द संरक्षित

अप्रकाशित प्रत

नसल्यामुळे जलप्रवाह आणि पाणलोटक्षेत्रात व कॅनॉल मध्ये बुडून अनेकांचा बळी गेला असणे, खडकवासला धरण हे सुरक्षित नसून धरणाच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करत जलसंपदा विभाग पुणेकरांच्या जीवाशी खेळत असणे, सीसीटीव्ही, सुरक्षारक्षक, माहिती फलक, संरक्षण जाळी, संरक्षण भिंतीसारख्या प्राथमिक गरजा देखील पूर्ण करण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास येत असणे, जलसंपदा विभागाचा लोकप्रतिनिधी यांच्याशी समन्वय नसणे याकडे जलसंपदा विभागाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

(६) **ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्याच्या अर्थसंकल्पात प्रत्येक वर्षी जिल्हा वार्षिक योजना व राज्य योजनेतून मोठा निधी पायाभूत सुविधेवर खर्च होणे, प्रत्येक वर्षी जिल्हा वार्षिक योजनेत वाढ होणे व त्यातुन सामुहिक विकासाची व कायमस्वरूपी मालमत्ता निर्माण करणाऱ्या योजना राबविण्यात येणे, परंतु उपरोक्त विकास कामे घेताना रोजगार निर्मितीकडे शासनाचे दुर्लक्ष होणे, एकूण विकास कामे करताना दरडोई उत्पन्न वाढविणाऱ्या योजना प्रभावीपणे अंमलात आणण्यात शासनाचे झालेले दुर्लक्ष, सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागाकडून ही मोठ्या योजना अंमलात आणताना साधारणतः १२.५० टक्के व ९.६ टक्के निधी खर्च होणे, परंतु त्यातूनही मोठा निधी फक्त पायाभूत सुविधेवरच खर्च होणे, त्यामुळे आर्थिकदृष्टया दुर्बल व दारिद्रयात जीवन जगत असलेल्या कुटुंबियांच्या जीवनात उत्थान करण्याच्या शासनाच्या उद्देशाची पुर्तता होण्यास विलंब होणे, राज्यात राहणाऱ्या लोकांची रोजगार निर्मिती व उत्पन्नवाढ याकडे शासनाने प्राधान्य देण्याची गरज, मागील ७५ वर्षात राज्यात मोठी पायाभूत सुविधा निर्माण झाली असतानाही आता पुन्हा बहुतांश निधी हा नागरिकांच्या गरजेनुसार न होता शासनाच्या प्रचलित योजनेवरच खर्च होत असल्याने याबाबत पुर्नविचार करण्याची आवश्यकता, राज्याच्या मनुष्यबळाचा विचार करून त्या मनुष्यबळाचा वापर होण्याच्या दृष्टीने व राज्याची उत्पादकता वाढविण्याच्यादृष्टीने राज्यात लागणारे सर्व वस्तुंचे उत्पादन राज्यातच होण्याच्या दृष्टीने व राज्याला आत्मनिर्भर करण्याच्यादृष्टीने नियोजन करण्याची आवश्यकता, याकडे नियोजन विभागाचे झालेले दुर्लक्ष, शासनाने पायाभूत सुविधेसोबत रोजगार निर्माण करण्याच्या योजनेसाठीही ठराविक निधी खर्च करण्याची आवश्यकता, याकडे शासनाच्या दुर्लक्षामुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगारांची संख्या वाढत असल्याने उद्भवणाऱ्या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने विचार करून नियोजन करण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(७) सर्वश्री.प्रताप सरनाईक, अतुल भातखळकर, डॉ.जितेंद्र आव्हाड, सर्वश्री छगन भुजबळ, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, रोहित पवार, दत्तात्रय भरणे, शेखर निकम, संजय बनसोडे, सुनिल टिंगरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पशुसंवर्धन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात लाखो भटके कुत्रे असून त्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असणे, भटक्या कुत्र्यांमुळे नागरिक हैराण झाले असून त्यामुळे शहरातील वातावरण आणि मानवी आरोग्यावर अनेक नकारात्मक परिणाम होत असणे, ठिकठिकाणी श्वानदंशाच्या घटना घडत असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिकांसह सर्वसामान्य नागरिक यात जखमी होत असणे, तसेच भटके कुत्रे मागे लागल्याने वाहनांचे अपघातही होत असणे, अशा अनेक गोष्टींचा त्रास होत असल्याने "भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा" अशी मागणी नागरिक करीत असणे, याउलट ठिकठिकाणी प्राणीमित्र व त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संघटना असल्यामुळे अनेक ठिकाणी नागरिक आणि श्वानप्रेमी यांच्यात संघर्ष होत असल्याचेही आढळून येणे, प्रत्येकाला जगण्याचा अधिकार असून ग्रामीण भागात शेतकऱ्यांना श्वानांची मदत होत असणे, त्यामुळे जखमी आजारी भटक्या कुत्र्यांसाठी शासकीय पशुवैद्यकीय सर्व चिकीत्सालये, खासगी पाळीव प्राण्यांचे दवाखाने, श्वान निर्बिजीकरण केंद्रे यांच्या माध्यमातून त्यांच्यावर उपचार करणे व नसबंदीबाबत मार्ग काढणे शक्य असणे, पण असे होताना दिसत नसून अनेक नगरपालिका, महापालिका यांचे याबाबत कोणतेही धोरण नसणे, यासाठी शासनाने प्रत्येक मोठ्या गावात, शहरात, महानगरात व तालुक्यात श्वान गणना व त्यांची नोंदणी करून भटके व पाळीव कुत्रे किती आहेत याची संख्या निश्चित करून एकही भटका कुत्रा रस्त्यावर राहणार नाही अशी प्रभावी अंमलबाजवणी करण्याची आवश्यकता, याबाबत कृती करताना सर्व भटक्या कुत्र्यांची गणना करून, त्यांना ताब्यात घेऊन त्यांचे निर्बिजीकरण करणे, जखमी कुत्र्यांवर उपचार करून त्यांना बरे करणे व जेथे श्वान संख्या अधिक आहे त्याठिकाणी त्यांच्यासाठी "श्वानगृहे" तयार करणे अशा पध्दतीत काम होणे आवश्यक असून त्यासाठी निर्बिजीकरण केंद्रे वाढविण्याची आवश्यकता, तसेच प्राणीप्रेमी किंवा दत्तक घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीला दत्तक योजनेच्या माध्यमातून चांगले सुदृढ केलेले श्वान संगोपन करण्यास दत्तक देण्याची आवश्यकता, त्यासाठी श्वानाचे शेवटपर्यंत सांभाळ करण्याविषयी दत्तक घेणाऱ्याकडून शपथपत्र घेऊन नियम कडक करून दत्तक योजनेची स्थानिक प्रशासनाकडून नीट अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, श्वानांसाठी आवश्यक लसी, औषधोपचार हे सरकारी दवाखान्यातून मोफत देणे गरजेचे असणे, हे सर्व करण्यासाठी शासनाने धोरण, नियमावली, कृती कार्यक्रम निश्चित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**चार : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा - (मुख्यमंत्र्यांचे उत्तर).**

अग्रिम प्रत

**पाच : सन २०२२-२०२३ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा व शेवटचा दिवस).**

(१) ग्रामविकास विभाग

(२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

(३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**
**[चर्चारोध (गिलोटीन) सायंकाळी ०५.३० वाजता]**

**सहा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ, विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२३.

**(ब) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ – महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३.

**(क) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ – महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ – महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अमुद्रित प्रत

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अनिल पाटील व धनंजय मुंडे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अस्वाक्षरित प्रत

**(छ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.विजय वडेट्टीवार, सुनिल केदार व अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ज) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(झ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.नाना पटोले, बाळासाहेब थोरात, सुरेश वरपुडकर, शिरीषदादा चौधरी, संजय जगताप, विकास ठाकरे व अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ट) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अस्वीकृत प्रत

**(२) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ — महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण विधेयक, २०२३**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ — महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अनिल पाटील व धनंजय मुंडे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ — महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ — महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ — महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ – महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(छ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.विजय वडेट्टीवार, सुनिल केदार व अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ – महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ज) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ – महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(झ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.नाना पटोले, बाळासाहेब थोरात, सुरेश वरपुडकर, शिरीषदादा चौधरी, संजय जगताप, विकास ठाकरे व अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ – महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ट) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ – महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही

अग्रिम प्रत

सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(गुरूवार, दिनांक २ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सात : डॉ. संजय कुटे, सर्वश्री चिमणराव पाटील, रणधीर सावरकर, रमेश बोरनारे, संजय सावकारे, अनिल बाबर, डॉ.प्रा. अशोक उइके, श्री. राजेश पवार, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री तानाजी मुटकुळे, बबनराव लोणीकर, संजय गायकवाड, डॉ. देवराव होळी, सर्वश्री राजेंद्र पाटणी, समीर कुणावार, महेंद्र थोरवे, ॲड़ आकाश फुंडकर, सर्वश्री सुरेश भोळे, जयकुमार रावल, भरतशेट गोगावले, हरिभाऊ बागडे, प्रशांत बंब, दिलीप बोरसे, योगेश कदम, संतोष दानवे, बबनराव पाचपुते, ॲड. लक्ष्मण पवार, सर्वश्री दिलीप लांडे, संभाजी निलंगेकर-पाटील, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री नितेश राणे, गणेश नाईक, अभिमन्यू पवार, ॲड़ शहाजीबापू पाटील, सर्वश्री महेश शिंदे, प्रकाश आबिटकर, महेंद्र दळवी, विनोद अग्रवाल, राम सातपुते, जयकुमार गोरे, ज्ञानराज चौगुले, सुभाष देशमुख, सर्वश्रीमती मोनिका राजळे, मेघना साकोरे-बोर्डीकर, ॲड़ राहुल कुल, श्री. किसन कथोरे, डॉ. राहुल आहेर, डॉ. संदिप धुर्वे, सर्वश्री हरीष पिंपळे, दादाराव केचे, किर्तीकुमार भांगडीया, कृष्णा खोपडे, विजय रहांगडाळे, कृष्णा गजबे, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री प्रकाश भारसाखळे, प्रताप अडसड, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, सर्वश्री काशिराम पावरा, मंगेश चव्हाण, राजेश पाडवी, डॉ. तुषार राठोड, श्री. नारायण कुचे, सर्वश्रीमती मंदा म्हात्रे, मनिषा चौधरी, सर्वश्री प्रशांत ठाकूर, रविशेठ पाटील, महेश बालदी, महेश चौगुले, गणपत गायकवाड, योगेश सागर, राम कदम, सुनिल कांबळे, अतुल भातखळकर, राणा जगजितसिंह पाटील, विजयकुमार देशमुख, सचिन कल्याण-शेट्टी, धनंजय गाडगीळ, समाधान अवताडे, प्रकाश आवाडे, रवि राणा, डॉ. विनय कोरे, सर्वश्री रत्नाकर गुट्टे, राजेंद्र राऊत, नामदेव ससाणे, भिमराव केराम, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

"मागील सरकारच्या कार्यकाळात, शेतकरी बांधवाच्या समस्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी मागील सरकारने एक वर्षात केवळ रु.६००० कोटी वितरित केलेले असतांना महायुती सरकारने रु.१२००० कोटी केवळ ७ महिन्यांच्या कालावधीत वितरीत करून मागील सरकारच्या कार्यकाळात शेतकरी बांधवांवर झालेला अन्याय दूर करणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीचे

निकष महायुती सरकारने दिड पटीने वाढवून शेतकऱ्यांना अगोदरच्या मानकांपेक्षा अतिरिक्त मदत मिळेल याची काळजी घेणे, सत्तेवर येताच मागील सरकारने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेची अंमलबजावणी थांबविणे व त्याच वेळेस नियमितपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना रु. ५०,०००/- इतके प्रोत्साहन देण्याची घोषणा मागील सरकारने सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या दोन्हीही अर्थसंकल्पीय भाषणात करूनही प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना टाळाटाळ करणे, परंतु शेतकरी हित लक्षात घेवून महायुती सरकारने सत्तेवर येताच शेतकरी बांधवाना प्रोत्साहनपर रु. ५०,०००/- देण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करून प्रत्यक्ष मात्र शेतकरी बांधवाच्या खात्यात आजपर्यंत रु.४७०० कोटी जमा करण्यात येणे, विदर्भ, मराठवाडा व खान्देशासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सातत्याने सत्तेवर असूनही आघाडी सरकारने कायमस्वरूपी सोडविण्याचा कधीही प्रयत्न न करणे, परंतू त्याच वेळेस महायुती सरकारने जून २०१९ मध्ये वैनगंगा-नळगंगा नदी जोडप्रकल्प, कोकणात वाहून जाणाऱ्या १८७ अब्ज घनफुट पाणी मराठवाडा व खान्देशात वळविण्याची घोषणा करणे, परंतू मागील सरकारने ३२ महिन्याच्या कार्यकाळात या शेतकरी हिताच्या प्रकल्पांकडे दुर्लक्ष करणे, नव्याने सत्तेवर येताच गत अधिवेशनात विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची सिंचनाची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी वैनगंगा-नळगंगा ते पैनगंगा प्रकल्पास मान्यता देणे, कृष्णा-भिमा-मराठवाडा स्थिरीकरण प्रकल्पासही मान्यता देणे, तसेच समुद्रात वाहून जाणारे १८७ टीएमसी पाणी मराठवाडा, खान्देशाकडे वळविण्याच्या प्रकल्पास गती देण्यात येणे, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेला बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प मागील सरकारकडून दुर्लक्षित होणे, शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाच्या असणाऱ्या प्रकल्पास महायुती सरकारने सत्तेवर येताच गती देणे, मागील सरकारच्या ३२ महिन्याच्या कार्यकाळात केवळ १४ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे, परंतू महायुती सरकारने केवळ ६ महिन्याच्या कार्यकाळात २३ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे, या प्रकल्पांच्या माध्यमातून ५,२१,६५१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येवून त्याचा फायदा लाखो शेतकऱ्यांना होणे, जलयुक्त शिवार योजनेचा टप्पा २ नव्याने कार्यान्वित करुन शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे विद्यमान शासनाचे प्रयोजन, शेतकरी बांधवांच्या शेतीकरीता दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी मागील सरकारकडून सातत्याने दुर्लक्षित होणे, परंतु महायुती सरकारने हा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेव्दारे शेती पंपाकरीता दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी तातडीने प्रयत्न सुरू करणे, मागील सरकारच्या कार्यकाळात कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना उभे राहण्याची मुभा नसणे, परंतु महायुती सरकारने शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये प्रतिनिधित्व मिळावे या उदात्त हेतूने कायद्यामध्ये आवश्यक ते बदल करणे, राज्यात ग्रामीण आरोग्य विभागांतर्गत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना सुरु करुन जिल्हया-जिल्हयांत आरोग्य सुविधा सहज उपलब्ध करण्याचे विद्यमान शासनाचे धोरण, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये व्यापाऱ्यांसाठी मोठे गाळे बांधत असतांना शेतकऱ्यांसाठी

अग्रिम प्रत

साधी राहण्याची सोयही वर्षानुवर्ष उपलब्ध नसणे, ही बाब लक्षात घेवून प्रत्येक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एक शेतकरी भवन स्थापन करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(गुरूवार, दिनांक २ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**आठ : सर्वश्री. अजित पवार, बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, नानाभाऊ पटोले, छगन भुजबळ, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, आदित्य ठाकरे, अजय चौधरी, दिलीप वळसे-पाटील, सुनिल प्रभू, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री भास्कर जाधव, धनंजय मुंडे, रविंद्र वायकर, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री राजेश टोपे, सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री हसन मुश्रीफ, अमित देशमुख, अनिल देशमुख, अबू आजमी, रईस शेख, विनोद निकोले, बाळासाहेब पाटील, सुरेश वरपुडकर, अनिल पाटील, संग्राम थोपटे, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री राजन साळवी, दिलीपराव बनकर, चेतन तुपे, सुनिल शेळके, ॲड. के. सी. पाडवी, शिरीष चौधरी, अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अमीन पटेल, कुमारी प्रणिती शिंदे, डॉ. विश्वजित कदम, डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री. सुनिल राऊत, कुमारी आदिती तटकरे, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री दिलीप मोहिते-पाटील, दत्तात्रय भरणे, ॲड. अशोक पवार, सर्वश्री. सुनिल टिंगरे, प्राजक्त तनपूरे, रोहित पवार, निलेश लंके, आशुतोष काळे, संजय बनसोडे, बबनराव शिंदे, यशवंत माने, दिपक चव्हाण, मकरंद जाधव-पाटील, शेखर निकम, राजेश पाटील, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री मानसिंग नाईक, देवेंद्र भुयार, संजयमामा शिंदे, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री धर्मरावबाबा आत्राम, दौलत दरोडा, सुनिल भुसारा, अतुल बेनके, अण्णा बनसोडे, संग्राम जगताप, वैभव नाईक, संजय पोतनीस, श्रीमती ऋतुजा लटके, सर्वश्री कुणाल पाटील, विकास ठाकरे, कैलास गोरंट्याल, संजय जगताप, रणजीत कांबळे, लहू कानडे, ऋतुराज पाटील, राजु आवळे, पी. एन. पाटील, विक्रमसिंह सावंत, नितीन पवार, शिरीषकुमार नाईक, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री अमित झनक, राजु पारवे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मनोहर चंद्रिकापूरे, इंद्रनिल नाईक, चंद्रकांत नवघरे, राजू कारेमोरे, प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, बाबासाहेब पाटील, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री रमेश कोरगांवकर, कैलास घाडगे पाटील, नितीन देशमुख, उदयसिंग राजपुत, राजेश एकडे, बळवंत वानखडे, सहसराम कोरोटे, सुभाष धोटे, मोहनराव हंबर्डे, जितेश अंतापूरकर, हिरामण खोसकर, झीशान सिद्दिकी, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री माधवराव पवार, धिरज देशमुख, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

अप्रसिद्ध प्रत

"राज्यातील शेतकरी अडचणीत आला असणे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना 'टप्पा-२' मध्ये १ टक्काही रक्कम खर्च केली नसल्यामुळे मोठी रक्कम केंद्र सरकारला परत करण्याची नामुष्की राज्यावर आली असणे, कृषि मंत्री यांनी वर्ग ३ च्या कर्मचाऱ्यांच्या आंतरविभागीय बदल्या, भरती व पदोन्नतीबाबत शासनाची मान्यता घेण्याचा तुघलकी आदेश काढला असणे, केंद्र सरकारकडून मनरेगा पंतप्रधान शेतकरी अनुदान योजना, राष्ट्रीय कृषी विकास योजना, पीक विमा योजना, बाजार हस्तक्षेप योजना आणि मूल्य समर्थन योजनांच्या तरतुदी सातत्याने कमी केल्या जात असल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात घट होत असणे, पंतप्रधान कृषी सिंचन योजनेतून तुषार आणि ठिबकचे अनुदान शेतकऱ्यांना मिळाले नसणे, "ग्रॉस डोमेस्टीक क्लायमेट रिस्क" या संस्थेच्या अहवालात महाराष्ट्राचाही समावेश असणे, महागाईचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला असून शेतीमालाचे दर घसरले असणे, कोरोनापश्चात ग्रामीण भागाकडे झालेले स्थलांतर लक्षात घेता स्थलांतरित मजुरांच्या हाताला काम देण्यासाठी जलसंधारण, रोपवाटिका, रोजगार हमीच्या कामांबरोबरच ग्रामविकासाच्या विविध योजना आखण्याची आवश्यकता, तृणधान्याच्या प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी धडक कार्यक्रम राबवण्याची आवश्यकता, केंद्र, राज्याकडून सोयाबीन, कापूस, कांदा, द्राक्ष, हरभरा उत्पादकांची फसवणूक झाल्यामुळे शेतकरी रस्त्यावर आला असणे, या शेतकऱ्यांवर सरकारकडून लाठीचार्ज करण्यात आला असणे, पीक विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना नाडले जात असताना अतिवृष्टीची मदतही अद्याप सर्व पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नसणे, परिणामी शेतकरी आत्महत्यांमध्ये मोठी वाढ झाली असणे, केंद्र सरकारची किसान ड्रोन अनुदान योजना कागदावरच राहिली असणे, कृषि मालाच्या आयात-निर्यात धोरणातील धरसोडपणामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असणे, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत पात्र ठरुनही अद्याप हजारो शेतकरी लाभापासून वंचित राहिले असणे, पीक कर्ज देण्यासाठी बँकांनी हात आखडता घेतला असून सिबील सक्ती अद्याप कायम असणे, प्रोत्साहन अनुदान योजनेचा लाभ हजारो शेतकऱ्यांना मिळाला नसणे, सहकारी संस्थांच्या नोंदणीत सरकारच्या हस्तक्षेपामुळे निर्माण झालेला प्रश्न, राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना केंद्र सरकारच्या एनसीडीसी संस्थेकडून देण्यात येणाऱ्या कर्जांमध्ये पक्षपातीपणा झाला असणे, सिंधुदूर्ग जिल्ह्यात १२ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी या काळात वादळाचा तडाखा बसून काजू बी आणि काजू झाडांचे प्रचंड नुकसान झालेले असणे, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाची अंमलबजावणी होत नसणे, फळपीक कर्जासाठीच्या वाढीव व्याजामुळे संत्रा व इतर फळपिक उत्पादकांना तोटा सहन करावा लागत असणे, द्राक्षाची कमी झालेली निर्यात, मराठवाड्याप्रमाणे कोकणातही वानरांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करण्यासाठी धडक मोहिम राबवण्याची आवश्यकता, सातबारा उताऱ्यावरील पीकपेरा नोंदीअभावी पालघर जिल्ह्यातील विक्रीअभावी पडून राहिलेल्या भात उत्पादकांना दिलासा देण्याची आवश्यकता, कांद्याचे दर सातत्याने घसरत असल्यामुळे कांदा उत्पादक हवालदिल झाला असणे, हमीभाव केंद्रावर धान विकणाऱ्या

अग्रिम प्रत

शेतकऱ्यांना बोनस देण्याच्या घोषणेची अंमलबजावणी झाली नसणे, महाराष्ट्र राज्य दूध महासंघ (महानंद) आर्थिक अडचणीत आला असून याबाबत तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, लॅम्पी आजाराच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील पशुधन संकटात आले असणे, राष्ट्रीय अंडी समन्वय समितीकडून अंड्याच्या दरात अवाजवी चढ-उतार होत असल्यामुळे शेतकरी अडचणीत आला असणे, मच्छिमारांच्या विविध प्रश्नांकडे सरकारचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, मत्स्यव्यवसायला मत्स्यशेतीचा दर्जा देण्याबाबत होत असलेली मागणी, पर्ससिन मच्छिमार बोटींमुळे निर्माण झालेले मच्छिमारांपुढील संकट, मत्स्यदुष्काळ जाहीर करण्याची होत असलेली मागणी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडील कामे सुरु करण्याबाबत सरकारची धरसोड वृत्ती, परभणी जिल्ह्यात कंत्राटदाराकडून लाच घेताना जलसंधारण विभागाचा उपविभागीय अधिकारी व लिपिक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले असणे, व्यवस्थापकीय संचालकांचाही यातील सहभाग उघड झाला असणे, या व अन्य समस्यांबाबत सरकार गंभीर नसल्यामुळे शेतकरी, शेतमजूर व शेतीवर अवलंबून असलेल्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**अशासकीय कामकाज**

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**नऊ : अशासकीय विधेयके :-**

**(दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अशासकीय विधेयकाच्या सूचना)**

**पुर:स्थापनार्थ :**

(१) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२१- **श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र राज्यातील बेरोजगार युवक-युवतींना बेरोजगार भत्ता विधेयक,२०२१ – **श्री.प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांचे.**

अप्रकाशित प्रत

(३) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक, २०२१ - **श्री. सुहास (आण्णा) कांदे, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ०२ - भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२२ - **श्री संजय सावकारे, वि.स.स. यांचे.**

(५) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ०८ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था (सुधारणा) विधेयक,२०२२ - **ॲड राहुल कुल, वि.स.स. यांचे.**

(६) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२२ – **श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांचे**.

(७) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२२ - **ॲड राहुल कुल, वि.स.स. यांचे.**

(८) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०२२ - **श्री. प्राजक्त तनपुरे, वि.स.स. यांचे.**

(९) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ – महाराष्ट्र परदेशातील रोजगार संरक्षण विधेयक, २०२२ – **डॉ.राहुल वेदप्रकाश पाटील, वि.स.स. यांचे.**

**दहा : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

**(शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अशासकीय ठरावाच्या सूचना)**

(१) **श्री. प्रताप अडसड, वि.स.स. यांचा ठराव क्र. १३३**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या

अप्रकाशित प्रत

परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) **श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांचा ठराव क्र. १७**

"राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि इतर महानगरपालिकामधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठया वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका व त्यामुळे होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासियांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ.बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांचा ठराव क्र. ५९**

"राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्गावर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरु करणे, सदरची उपचार केंद्रे सुरु झाल्यास तेथे वैदयकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी यांची नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळणे, राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होणे, तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार मिळणे, यासाठी राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४) **प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांचा ठराव क्र. ६९**

"राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्तापित झालेल्या विशेषत: यवतमाळ जिल्हयातील बेंबळा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने

अप्रकाशित प्रत

विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी, इ.बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५) **श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २३१**

"दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटूंबाना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६) **श्री. संजयमामा शिंदे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २१९**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

असुधारित प्रत

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २ मार्च, २०२३

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा